सं.फौ.ख.क्र. ६२/२०२३



सरकार वि. निखिल

निशाणी क्र.२४

**सरकारतर्फे साक्षदार क्रमांक ५ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव – सागर श्रीकृष्ण उके

वय – २४ वर्ष, व्यवसाय – नौकरी

राहणार – राय नगर, कन्हान, ता.पारशिवणी, जिल्हा नागपूर

**<u>सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता एस.व्ही. रामटेके यांच्यातर्फे</u>**

१. घटना दिनांक ११/०९/२०२२ रोजी संध्याकाळी ७.०० वाजताच्या सुमारास तारसा रोड कन्हान येथे घडली होती. त्यावेळी मी, माझे वडील, माझा काका भुमीराज, त्याची पत्नी व त्यांचा मुलगा असे घटनास्थळी उभे होतो. आमचे बोलणे झाल्यानंतर माझे काका घरी जाण्याकरीता ॲक्टीव्हा ने निघाले होते परंतु थांबले होते. त्यावेळी कामठी कडून निखील हुड नावाचा मुलगा ड्रीम युगा काळया रंगाच्या मोटरसायकलने आला व माझ्या काकाच्या गाडीला धडक मारली. त्या मोटरसायकल चा क्रमांक एमएच–४०–ए.एल.–६९२७ असा होता. धडकेमुळे माझे काका, काकु व त्यांचा मुलगा खाली पडले. त्यामुळे माझ्या काकाच्या उजव्या पायाला मार लागला. त्यानंतर मी, माझे वडील व आजूबाजूच्या लोकांनी मिळून माझ्या काकाला उचलून साईडला केले. त्यानंतर माझ्या काकाला ऑटोमध्ये आशा हॉस्पीटल येथे नेले. पोलीसांनी माझे बयान घेतले होते.

**सरतपास पूर्ण**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे वकील रिना गणवीर यांच्यातर्फे.</u>**

२. पोलीसांना बयान देतांना 'त्यावेळी मी, माझे वडील, माझा काका भुमीराज, त्याची पत्नी व त्यांचा मुलगा असे घटनास्थळी उभे होतो, आमचे बोलणे झाल्यानंतर माझे काका घरी जाण्याकरीता ॲक्टीव्हा ने निघाले होते परंतु थांबले होते, त्यावेळी कामठी कडून निखील हुड नावाचा मुलगा काळया रंगाच्या मोटरसायकलने आला, त्यानंतर मी, माझे वडील व आजूबाजूच्या लोकांनी मिळून माझ्या काकाला उचलून साईडला केले.' याबाबी सांगितल्या होत्या परंतु सदर बाबी माझ्या बयानात नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. पोलीसांनी माझे

बयान कधी घेतले याची तारीख माझ्या लक्षात नाही. ज्या ऑटोने माझ्या काकाला हॉस्पीटल ला नेले त्याचा क्रमांक माझे लक्षात नाही. हे म्हणणे खरे नाही की ड्रीम युगा मोटरसायकल क्रमांक एमएच–४०–ए.एल.–६९२७ ने माझ्या काकाच्या गाडीला धडक दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या काकाच्या उजव्या पायाला मार लागल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की घटनेच्या वेळी माझ्या काकाच्या मोटरसायकल वर तीन जण होते. हे म्हणणे खरे नाही की माझ्या काकाच्या गाडीवर तिघे जण असल्यामुळे रोड क्रॉस करत असतांना माझ्या काकाचा तोल गेला व त्यामुळे ते खाली पडले. हे म्हणणे खरे नाही की अपघातातील नुकसान भरपाई मिळावी म्हणून आरोपी विरुध्द खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2024.07.05 16:31:05 +0530

ठिकाण –कामठी (रा.र. शेरेकर)

दिनांक –०५/०७/२०२४ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. ३, कामठी.